निवडणूक प्रक्रिया पार पडल्यानंतर सादर करावयाची प्रमाणपत्रे

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक -रानिआ/जिपपंस/२०१६/प्र.क्र.२६/का.७
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालयासमोर, मादाम कामा रोड,
मुंबई- ४०० ०३२
दिनांक- ०९/११/२०१६

## आ दे श

भारतीय संविधानाच्या तरतुदी (परिच्छेद २४३के व २४३झेडए) अनुसार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुका त्यांच्या मुदत संपण्यापूर्वी निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात पार पाडण्याची सर्व जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाच्यावतीने संबंधित जिल्हाधिकारी व महानगरपालिका आयुक्त हे पार पाडत असतात.

२. राज्य निवडणूक आयोगाच्या असे निर्दशनास आले आहे की, सार्वत्रिक निवडणुका संपल्यानंतर आवश्यक ती कार्यवाही उदा. झालेल्या खर्चाचे देयके अदा करणे, खर्चाचा तपशील सादर न करणारे उमेदवारांना अनर्ह ठरविणे, निवडणुकीविषयीचे अहवाल सादर करणे, इत्यादी विषयाबाबत काही जिल्हाधिकारी/महानगरपालिका कार्यालयात अनास्था दिसून येते. हया आवश्यक माहिती अभावी आगामी निवडणूका निर्भय, मुक्त व पारदर्शक घेण्यास बाधा निर्माण होते व कार्यालयीन वेळेचा अपव्यय होतो.

३. वरील बाबी लक्षात घेता निवडणूका संपल्यानंतर संबंधित जिल्हाधिकारी यांना जिल्हा परिषद/ पंचायत समिती/ग्रामपंचायत /नगर परिषदा व नगरपंचायती करिता व महानगरपालिका आयुक्त यांना महानगरपालिकांकरिता खालील प्रमाणपत्रे आयोगाला विहित वेळेत व रितीने सादर करणे आवश्यक करण्यात येत आहेत:-

(i) निवडणुकीवर झालेल्या खर्चाची सर्व देयके अदा करणे व थकबाकी नसणे -

(अ) नागरी स्थानिक स्वराज्य संस्था (नगर परिषदा/नगर पंचायती व महानगरपालिका) :-

या निवडणुकीवर होणाऱ्या खर्चाची संपूर्ण जबाबदारी त्या त्या स्थानिक स्वराज्य संस्थेची

आहे. त्यांनी निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर ६० दिवसांच्या आत सर्व देयके अदा करावीत. त्यानंतर कोणत्याही परिस्थितीत कसलीही थकबाकी राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

या आशयाचे प्रमाणपत्र संबंधित जिल्हाधिकारी (विभागीय आयुक्त यांचेमार्फत) किंवा महानगरपालिका आयुक्त यांनी निवडणूका संपल्यानंतर ६० दिवसांच्या आत नमुना-१(अ) मध्ये आयोगाला सादर करावे.

(ब) **जिल्हा परिषद व पंचायत समिती / ग्रामपंचायती :-** या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीवर होणाऱ्या खर्चाची सर्व जबाबदारी राज्य शासनाची आहे.

जिल्हाधिकारी यांनी शासनाने निश्चित केलेले खर्चाचे निकषामधून (सध्याचे जिल्हा परिषद/ पंचायत समिती-रु.४०/- प्रति मतदार व रु.५०,०००/- प्रति ग्रामपंचायत) अग्रक्रम ठरवून आवश्यक तो सर्व खर्च करावा व सर्व देयके निवडणूक संपल्यानंतर ६० दिवसांच्या आत अदा करावीत.

निकषापेक्षा जास्त खर्च होत असेल तर शासनाने जिल्हा परिषद/पंचायत समितीकरिता मंजूर केलेल्या नियमीत अनुदानातून देणे शक्य आहे किंवा कसे, हे जिल्हाधिकारी यांनी तपासावे. तसे शक्य होत नसेल तर संयुक्तिक कारणासह जिल्हाधिकारी यांनी ग्रामविकास विभागाकडे अधिक निधीची मागणी करावी.

वरील आशयाचे प्रमाणपत्र जिल्हाधिकारी (विभागीय आयुक्त यांच्यामार्फत) राज्य निवडणूक आयोगास निवडणूक संपल्यानंतर ६० दिवसांच्या आत नमुना-१(ब) मध्ये सादर करावे.

(क) झालेल्या खर्चाचा तपशील उदाहरण म्हणून सोबत जोडलेल्या विवरणपत्राप्रमाणे द्यावा.

(ii) **निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर सर्व उमेदवारांनी खर्चाचा हिशोब ३० दिवसांच्या आत सादर करणे आवश्यक.**

खर्चाचा हिशोब सादर न करणाऱ्या सर्व उमेदवारांना अनर्ह ठरविण्याची कार्यवाही सुरु झाली या आशयाचे प्रमाणपत्र जिल्हाधिकारी (विभागीय आयुक्त यांचेमार्फत) व महानगरपालिका आयुक्त यांनी निवडणूका संपल्यानंतर ६० दिवसांचे आत नमुना-२ मध्ये सादर करावे.

(iii) **सर्व माहिती पाठविणे :-**

राज्य निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या सर्व नमुन्यात निवडणुकीशी निगडित सर्व माहिती जिल्हाधिकारी व महानगरपालिका आयुक्त यांनी ६० दिवसांत सादर करावी. या आशयाचे प्रमाणपत्र. (नमुना-३)

(iv) **माहिती पुस्तिका प्रकाशित करणे :-**

प्रत्येक जिल्हाधिकारी व महानगरपालिका आयुक्त यांनी झालेल्या निवडणुकीमध्ये राबविलेल्या नाविन्यपूर्ण योजना/ उचललेली नवीन पावले/राबविलेले उत्कृष्ट उपक्रम, इत्यादीसह एक सविस्तर माहिती पुस्तिका सर्वांच्या माहितीसाठी ६० दिवसांत प्रकाशित करावी.

३. वरील प्रमाणपत्रे व पुस्तक जिल्हाधिकारी व महानगरपालिका आयुक्त यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यानंतर जास्तीत जास्त ६० दिवसांमध्ये राज्य निवडणूक आयोगास सादर करावे.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

( एस.एम.चन्ने )
सचिव,
राज्य निवडणूक आयोग

प्रति :- सर्व विभागीय आयुक्त
सर्व महानगरपालिका आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी
राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी
निवड नस्ती

- जिल्हयाचे नाव :
- नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचे नाव :
- सार्वत्रिक/पोट निवडणूक:
- मतदानाचा दिनांक :
- मतमोजणीचा दिनांक :

नमुना - १ (अ)

# प्रमाणपत्र

## (नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकरिता)

## निवडणुकीवर झालेल्या खर्चाची सर्व देयके अदा करणे व थकबाकी नसणे

## ( निकाल जाहीर झाल्यानंतर जास्तीत जास्त २ महिन्याच्या आत राज्य निवडणूक आयोगास सादर करणे आवश्यक )

प्रमाणित करण्यात येते की, उपरोक्त सार्वत्रिक/पोट निवडणूका निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात पार पाडण्यासाठी नियमाप्रमाणे एकूण रक्कम रुपये--------- एवढा खर्च ( प्रति मतदार रक्कम रुपये -----) झाला आहे. हयाचा तपशील सोबतच्या विवरणपत्राप्रमाणे आहे.

२. विवरणपत्रात नमूद सर्व बाबींवर झालेला खर्च योग्य व आवश्यक असून त्याची सर्व देयके स्थानिक स्वराज्य संस्था यांच्याकडून अदा करण्यात आली आहेत.

३. सदर निवडणुकीसाठी करण्यात आलेल्या खर्चाची आजरोजी कोणतीही थकबाकी नाही.

दिनांक :

ठिकाण :

जिल्हाधिकारी (विभागीय आयुक्त मार्फत), किंवा
महानगरपालिका आयुक्त

• जिल्हयाचे नाव :
• ग्रामिण स्थानिक स्वराज्य संस्थेचे नाव :
• सार्वत्रिक/पोट निवडणूक:
• मतदानाचा दिनांक :
• मतमोजणीचा दिनांक :

नमुना - १(ब)

**प्रमाणपत्र**

**(ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांकरिता)**

**निवडणुकीवर झालेल्या खर्चाची सर्व देयके अदा करणे व थकबाकी नसणे**

**(निकाल जाहीर झाल्यानंतर जास्तीत जास्त २ महिन्याच्या आत राज्य निवडणूक आयोगास सादर करणे आवश्यक)**

प्रमाणित करण्यात येते की, उपरोक्त सार्वत्रिक/पोट निवडणका निर्भय, मुक्त, पारदर्शक वातावरणात पार पाडण्यासाठी नियमाप्रमाणे एकूण रक्कम रुपये ------------------- एवढा खर्च (प्रति मतदार रक्कम रु. --------------) झाला आहे. त्याचा तपशिल सोबतच्या विवरणपत्राप्रमाणे आहे. २. वरील खर्चाची सर्व देयके ग्रामविकास विभागाने निश्चित केलेल्या निकषाच्या अधिन राहून अदा करण्यात आली आहेत. झालेल्या खर्चाची कोणतीही थकबाकी नाही; किंवा

३. वरील खर्चापैकी एकूण रक्कम रुपये----------- ची देयके ग्रामविकास विभागाने निश्चित केलेल्या निकषामधून अदा करण्यात आली असून, आजरोजी एकूण रुपये .................... खर्चाची देयके अदा करण्याचे शिल्लक आहेत. त्यासाठी ग्रामविकास विभागाकडे पत्र क्र.----------------------------- दि.----------- ने अतिरिक्त अनुदानाची मागणी करण्यात आली आहे.

दिनांक :

ठिकाण : जिल्हाधिकारी (विभागीय आयुक्तांमार्फत)

## झालेल्या खर्चाचा तपशिल देण्यासाठी विवरणपत्र

**(उदाहरण म्हणून)**

- जिल्हयाचे नाव :
- स्थानिक स्वराज्य संस्थेचे नाव :
- सार्वत्रिक/पोट निवडणूक:
- मतदानाचा दिनांक :
- मतमोजणीचा दिनांक :

नमुना १-अ/ १-ब सोबतचे

विवरणपत्र

**( स्थानिक स्वराज्य संस्थांकरिता)**

**निवडणुकीवर झालेल्या खर्चाची सर्व देयके अदा करणे व थकबाकी नसणे**

एकूण प्रभागांची संख्या -

एकूण मतदान केंद्रांची संख्या -

| अ.क्र. | विषय | | | झालेला खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | **निवडणूक अधिकारी / कर्मचारी यांचे मानधन** | **एकूण संख्या** | **दर** | |
| | निवडणूक निर्णय अधिकारी | | | |
| | सहायक निवडणूक निर्णय अधिकारी | | | |
| | मतदान केंद्रावरील कर्मचारी | | | |
| | मतमोजणीसाठीचा कर्मचारी वृंद | | | |
| | निवडणूक कार्यालयातील कर्मचारी वृंद | | | |
| | निवडणूक निरीक्षकांचे मानधन | | | |
| | पोलिस | | | |
| २ | **मतदान साहित्यावरील खर्च** | | | |
| | मतदान केंद्रावरील साहित्य (टेबल, खुर्च्या, डोली, इ.) | | | |
| | पेंडॉलवरील खर्च | | | |
| | हमालीवरील खर्च (ई.व्ही.एम.व इतर निवडणूक साहित्य ने-आण करण्यासाठी) | | | |
| | मतदान साहित्य छपाई (मतपत्रिका व इतर साहित्य) | | | |
| | संगणकीकरण व इतर साहित्यावरील खर्च | | | |
| | ई.व्ही.एम. बॅटरी | | | |
| | मार्कर पेन | | | |

| | | |
|---|---|---|
| ३ | **वाहनांवरील खर्च ( संख्या) -** | |
| | ई.व्ही.एम.व इतर मतदान साहित्य यांची ने-आण | |
| | कर्मचारी वाहतूक खर्च | |
| | अधिकारी यांच्या वाहनांवरील खर्च | |
| | पेट्रोल, डिझेल वरील खर्च | |
| ४ | **प्रशिक्षणावरील खर्च** | |
| | प्रशिक्षण साहित्यावरील खर्च | |
| | प्रशिक्षण हॉल, खुर्च्या व इतर साहित्याचे भाडे | |
| ५ | **आचारसंहिता** | |
| | व्हिडीओग्राफी | |
| | कंट्रोल रुममधील व्यवस्था | |
| ६ | **कार्यालयीन खर्च** | |
| | इलेक्ट्रीसीटीवरील खर्च | |
| | टेलिफोन बिल | |
| | प्रिंटर्स, पेपर, स्टेशनरी, झेरॉक्स, इ.वरील खर्च | |
| | निवडणूक कार्यालयासाठी भाडे तत्वावर घेतलेल्या साहित्यावरील खर्च | |
| | इतर कार्यालयीन खर्च (बैठकीतील चहापानाचा खर्च) | |
| ७ | **मतदान जागृती अभियानावरील खर्च** | |
| ८ | **निवडणूक कामावरील कर्मचारी / अधिकारी यांचा मृत्यु वा दुखापत झाल्यास द्यावी लागणारी भरपाई** | |
| ९ | **इतर *** | |

** याव्यतिरिक्त झालेला खर्च तपशिलनिहाय सादर करावा.*

दिनांक :

ठिकाण :

जिल्हाधिकारी (विभागीय आयुक्त मार्फत)
/ महानगरपालिका आयुक्त

- जिल्हयाचे नाव :
- स्थानिक स्वराज्य संस्थेचे नाव :
- सार्वत्रिक/पोट निवडणूक:
- मतदानाचा दिनांक :
- मतमोजणीचा दिनांक :

## नमुना - २

## प्रमाणपत्र

## उमेदवारांनी खर्चाचा हिशोब सादर करण्याबाबत

**(निकाल लागल्यानंतर ६० दिवसांत राज्य निवडणूक आयोगाकडे सादर करणे आवश्यक)**

प्रमाणित करण्यात येते की, विषयांकित निवडणुकीत सोबतच्या विवरणपत्रामध्ये दर्शविल्याप्रमाणे ----- -उमेदवार उभे होते. त्यापैकी ----------- एकूण उमेदवारांनी निवडणूक खर्चाचा हिशोब निकाल लागल्यानंतर ३० दिवसांत विहित पध्दतीने सादर केला आहे.

२. विहित मुदतीत व विहित पध्दतीने खर्चाचा हिशोब सादर न करणाऱ्या ------------(अंकात) उमेदवारांना (यादी संलग्न) निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर ६० दिवसांच्या आत प्राथमिक नोटीसा जारी करण्यात आल्या आहेत.

३. या सर्व उमेदवारांविरुध्द निकाल जाहीर झाल्यापासून जास्तीत जास्त ६ महिन्याच्या आत अनर्ह करण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही पूर्ण करण्यात येईल.

दिनांक :

ठिकाण : जिल्हाधिकारी/महानगरपालिका आयुक्त

- जिल्हयाचे नाव :
- स्थानिक स्वराज्य संस्थेचे नाव :
- सार्वत्रिक/पोट निवडणूक:
- मतदानाचा दिनांक :
- मतमोजणीचा दिनांक :

नमुना - २ सोबतचे

विवरणपत्र

(उमेदवारांनी खर्चाचा हिशोब सादर करण्याबाबत)

जिल्हा परिषद, पंचायत समिती, महानगरपालिका, नगर पालिका/नगर पंचायती यासाठी स्वतंत्रपणे अहवाल सादर करणे.

* प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेच्या प्रभाग/निवडणूक विभाग/निर्वाचक गणनिहाय माहिती सादर करावी.

* * उमेदवाराच्या नाव व पक्षासहीत यादी स्वतंत्रपणे जोडावी.

एकूण प्रभाग/निवडणूक विभाग/निर्वाचक गणांची संख्या -

| अ.क्र. | प्रभाग/निवडणूक विभाग/ निर्वाचक गणाचा क्र व नाव * | निवडणूक लढविणारे एकूण उमेदवार (राजकीय पक्षनिहाय) | खर्चाचा हिशोब विहित मुदतीत सादर करणाऱ्या उमेदवारांची संख्या | खर्चाचा हिशोब विहित पध्दतीने व मुदतीत सादर न करणाऱ्या उमेदवारांची संख्या (राजकीय पक्ष निहाय) * * |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

दिनांक :

ठिकाण :

जिल्हाधिकारी / महानगरपालिका आयुक्त

- जिल्हयाचे नाव :
- स्थानिक स्वराज्य संस्थेचे नाव :
- सार्वत्रिक/पोट निवडणूक:
- मतदानाचा दिनांक :
- मतमोजणीचा दिनांक :

## नमुना ३

## प्रमाणपत्र

## आयोगास सर्व अहवाल विहित मुदतीत सादर केलेबाबत

**( निकाल जाहीर झाल्यानंतर जास्तीत जास्त ६० दिवसांत राज्य निवडणूक आयोगास सादर करणे )**

प्रमाणित करण्यात येते की, उपरोक्त निवडणुकीची सर्व निवडणूक प्रक्रिया निर्भय व मुक्त वातावरणात योग्यरितीने पूर्ण झाली असून राज्य निवडणूक आयोगाकडील आदेश क्र.रानिआ/जिपपंस-२०१६/प्र.क्र.२०/का.७, दि.२४/१०/२०१६ अन्वये निश्चित केलेले सर्व अहवाल विहित मुदतीत आयोगाकडे पाठविले आहेत. त्यामधील माहिती योग्य असल्याची खात्री करण्यात आली आहे.

तसेच माहिती पुस्तिका प्रकाशित करण्यात आली आहे.

दिनांक :

ठिकाण : जिल्हाधिकारी/महानगरपालिका आयुक्त